संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# अवैध धंद्यांचे पोषिंदे शोधा

**पुण्यातल्या** विषारी दारू प्रकरणात तब्बल २२ जणांचे बळी गेले. या प्रकरणाबाबत सरकारने यासंदर्भात २१ कर्मचाऱ्यांना निलंबितही केले. गेल्या आठ दिवसांत राज्यात ठिकठिकाणी अवैध दारूचे अड्डे उद्‌ध्वस्त करण्याचा सपाटा सुरू झाला. जवळपास शंभरावर ठिकाणी तयार होणारी अवैध दारू पोलिसांकडून नष्ट केली गेली. पुण्यातले दारूकांड घडले नसते तर राज्यातली ही सगळी अवैध दारूविक्री अशीच मोकाटपणे सुरू राहिली असती. साधारणपणे हा दरवेळचा अनुभव आहे. अवैध दारूकांडाची अशी काही प्रकरणे घडली की सरकारला जाग येते. आणि त्या त्या ठिकाणची पोलीस स्टेशन्स, उत्पादन शुल्क विभाग या सगळ्या यंत्रणा कामाला लागतात. आणि अवैध दारू अड्डे उद्‌ध्वस्त होत असतात. मात्र पुढच्या तीन ते सहा महिन्यामध्ये त्याच ठिकाणी पुन्हा दारूविक्रीचे नेटवर्क सुरू होते. एका अवैध दारूविक्री केंद्रातून किमान तीन ते चार लीटर दारू गाळली जाते. या अवैध विक्री दारूची महाराष्ट्रातील उलाढाल जवळपास दहा हजार कोटीपर्यंत असावी असा प्राथमिक अंदाज आहे. कारण पुण्यातल्या दारूकांडानंतर पोलीस यंत्रणांनी वेगवेगळ्या ठिकाणी जी काही कारवाई केली त्यामध्ये दहा कोटी रुपयांपर्यंतचा मुद्देमाल जप्त केला गेला. केवळ एका आठवड्यात सव्वातीन हजार गुन्हे नोंदवले गेले आणि २७०० आरोपींना अटकही केली गेली. हातभट्टीवर तयार होणारी ७५ हजार लीटर गावठी दारू जप्त केली गेली. यातला धक्कादायक भाग म्हणजे आतापर्यंत जी काही कारवाई झाली त्यात सर्वाधिक अवैध दारू ही पुणे जिल्ह्यात तयार होत असल्याचे समोर आले आहे. पुण्याच्या लौकिकाला काळीमा फासणारीच ही घटना ठरते. ज्याअर्थी पुण्यात इतक्या प्रचंड प्रमाणात अवैध दारूचा धंदा चालतो याचा अर्थ त्याला तितकेच तगडे संरक्षणही प्राप्त होते. महाराष्ट्रातल्या अवैध दारू विक्रीचे प्रमाण लक्षात घेतले तर या धंद्याला संरक्षण देणारा मुख्य अड्डा कोणता आहे, याचाच शोध घेतला पाहिजे.

### पुण्यात परिसरात सर्वाधिक अवैध दारू

यातला आणखी एक भाग म्हणजे पोलीस यंत्रणा जाणूनबुजून या सगळ्या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत असतात. राज्याचा उत्पादन शुल्क विभागसुद्धा या अवैध दारूविक्रीकडे दुर्लक्ष करतो आणि या धंद्यामध्ये चालणारी हप्तेबाजी प्रचंड मोठी असल्याने अगदी सहजपणे अवैध दारूविक्रीला स्थानिक पातळीवर मिळणारे संरक्षण आणि कारवाई झाल्यानंतरही अटक झालेल्यांना सहीसलामत बाहेर काढण्यासाठी खेळले जाणारे राजकारण आणि अर्थकारण तितकेच गंभीर ठरते. गेल्या सहा दशकांमध्ये महाराष्ट्रात विषारी दारूचे ५८४ म्हणजेच जवळपास सहाशे बळी गेलेले आहेत. यातला महत्त्वाचा भाग म्हणजे कोणत्याही दारूचे व्यसन हे अनेक व्याधी किंवा आजारांना आमंत्रण देणारे ठरते. त्यात गावठी दारूमुळे अधिक गंभीर स्वरूपाच्या शारीरिक व्याधी निर्माण होतात. ज्याला आपण स्लो पॉयझनिंग म्हणतो म्हणजेच अशा दारूच्या सेवनातून हळूहळू शरीरात भिनत जाणारे विष वेगवेगळ्या आजारांच्या माध्यमातून हजारो लोकांचा बळी घेतात हेदेखील दुर्लक्षित करता येणार नाही. संपूर्ण भारतात एका प्राथमिक अंदाजाप्रमाणे तब्बल ७५ हजार कोटींची अवैध दारूविक्री होते. या सगळ्या प्रकाराचे गंभीर परिणाम माहीत असूनही कोणत्याही राज्याने ठोस कारवाई केलेली नाही. शेजारच्या गुजरात राज्यात आणि बिहारमध्ये दारूबंदी आहे. तरीदेखील चोरट्या मार्गाने दारू विक्री होत राहते. परंतु तिथे मध्य प्रदेश, महाराष्ट्र या राज्यातून दारू पोहोचवली जाते. गेल्या एप्रिल महिन्यात गुजरातच्या भावनगर येथे एका छुप्या कारखान्यावर छापा टाकला गेला होता. त्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू जप्त झाली होती. दारुबंदी हा विषय तर दूरच राहिला. कारण सरकारला त्यातून मिळणाऱ्या महसुलाची सर्वाधिक चिंता असते. छत्तीसगढसारख्या राज्यात तर अगदी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सरकारी दारूविक्रीचे परवाने लिलाव पद्धतीने दिले जातात. दुर्दैवाचा भाग असा आहे की, सरकारच्या अधिकृत दारू विक्रीबरोबरच समांतर असे अवैध दारूविक्रीचेही धंदे तितक्याच तेजीमध्ये चालतात. महाराष्ट्रात त्याचे गेल्या दहा वर्षांमध्ये प्रमाण वाढलेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे स्थानिक पातळीवर त्याकडे दुर्लक्ष होते आणि अवैध दारूविक्रेत्यांना अनेक ठिकाणी राजकीय संरक्षणसुद्धा मिळत असते.

### इतर पदार्थांमध्येही भेसळ

एकीकडे अवैध दारूविक्रीचे बळी गेल्यानंतर ठिकठिकाणी छापेमारी झाली. त्याचवेळी राज्याच्या अन्न औषध प्रशासन विभागानेही अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थातून औषध उत्पादनातून होणाऱ्या भेसळीविरोधात मोहीम उघडली. आतापर्यंत तीन मोठ्या औषध कंपन्यांमधल्या औषध भेसळींविरोधात कारवाई झालेली आहे तर दुग्धजन्य पदार्थात म्हणजेच मावा, खवा यामध्येदेखील होणारी भेसळ या विभागाने शोधून काढली. काही विशिष्ट काळ या शोधमोहिमा घेतल्या जातात. याचा अर्थ संबंधित यंत्रणांकडून नियमितपणाने या भेसळीविरोधात कारवाई केली जात नाही किंवा आपण भेसळ केली तर पकडले जाऊ असाही त्यांना धाक राहिलेला नसतो. नियमितपणाने दुधापासून ते औषधांपर्यंत होणाऱ्या भेसळीविरोधात अधिक जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. कारण भेसळ करणारे असे धाडस करू शकतात. त्यांची संबंधित यंत्रणांबरोबर असलेली हातमिळवणी लोकांच्या जीवाशी खेळ करणारे ठरत असते. एकूणच सर्वच अवैध धंद्यांना संरक्षण देणारे इतरही मोठे अड्डे असतात. ते नेस्तनाबूत झाले पाहिजेत. खात्रीशीरपणे असे संरक्षण मिळत राहिल्याने कायद्याचा कोणताही परिणाम होत नाही. उलट कायदा धाब्यावर कसा बसवायचा याचे तंत्रही सरकारी यंत्रणांच्यामार्फत छुप्या पद्धतीने राबवले जाते. आणि अवैध धंद्यांना एक प्रकारे वैध असे संरक्षणही मिळत जाते. अन्यथा पुण्यासारख्या सांस्कृतिक महत्त्व असलेल्या जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक अवैध दारूविक्री होऊच शकली नसती.